ePaper

‘21 राज्यांमध्ये 2029 पूर्वी समान नागरी कायदा लागू होणार’

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™




गणेशोत्सवात शहरात जड वाहनांना ‘नो एन्ट्री’

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 14 सप्टेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी प्रशासनाची जय्यत तयारी...

## वाहतूक व्यवस्थेत बदल, मेट्रो सेवांचा विस्तार...

# बाप्पांच्या स्वागताला पुणे-मुंबई सज्ज!

महाईन्यूज । पुणे/मुंबई

**विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाची महाराष्ट्राला प्रतीक्षा अखेर संपणार असून, सोमवार, १४ सप्टेंबरपासून यंदाच्या गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे. पुणे आणि मुंबई या दोन्ही शहरांमध्ये गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन, पोलीस यंत्रणा, महापालिका आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेकडून तयारीला वेग आला आहे. घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळांकडूनही बाप्पांच्या स्वागताची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.**



### पुण्यात उत्साहाला उधाण

गणेशोत्सवासाठी पुण्यातील मध्यवर्ती भाग सज्ज झाला असून, मंडई, बोहरी आळीसह विविध बाजारपेठांमध्ये फुले, हार, तोरणे, सजावटीचे साहित्य आणि पूजासाहित्य खरेदीसाठी नागरिकांची गर्दी वाढली आहे. गणेश मंडळांचे मंडप, विद्युत रोषणाई आणि देखाव्यांची कामेही अंतिम टप्प्यात आहेत. गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर नागरिक मध्यवर्ती पुण्यात दाखल होणार असल्याने महापालिका आणि पोलीस प्रशासनाने प्रमुख मिरवणूक मार्गांची पाहणी केली आहे. रस्त्यांवरील खड्डे, अपूर्ण खोदकाम, ड्रेनेज, पादचारी मार्गावरील अडथळे तसेच विद्युत सुरक्षेचा आढावा घेऊन संबंधित विभागांना आवश्यक कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### पुणे मेट्रोची विशेष तयारी

गणेशोत्सवातील गर्दी लक्षात घेऊन पुणे मेट्रोनेही विशेष वेळापत्रक जाहीर केले आहे. १७ ते २४ सप्टेंबरदरम्यान मेट्रो सेवा सकाळी ६ ते रात्री २ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर २५ सप्टेंबर सकाळी ६ वाजल्यापासून २६ सप्टेंबर रात्री ११ वाजेपर्यंत तब्बल ४१ तास अखंड सेवा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. गर्दीच्या वेळेत फेऱ्यांची वारंवारताही वाढवण्यात येणार आहे.




### १४ सप्टेंबरला स्थापना, २५ सप्टेंबरला मुख्य विसर्जन

यंदा गणेश चतुर्थी सोमवार, १४ सप्टेंबर २०२६ रोजी आहे. त्यानंतर दीड, तीन, पाच आणि सात दिवसांच्या गणपतींचे विसर्जन होईल. अनंत चतुर्दशीला, म्हणजेच शुक्रवार, २५ सप्टेंबर २०२६ रोजी मुख्य गणेश विसर्जन मिरवणुका पार पडतील.पुणे-मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात गणरायाच्या स्वागतासाठी वातावरण भक्तिमय झाले असून, ढोल-ताशांचा गजर, सजावट, रोषणाई आणि गणेशमूर्तींच्या आगमनामुळे शहरांना उत्सवाचे स्वरूप आले आहे. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात बाप्पांच्या आगमनासाठी पुणे आणि मुंबई सज्ज झाल्या आहेत.

### मुंबईतही बाप्पांच्या स्वागताची लगबग

मुंबईत घरगुती तसेच सार्वजनिक गणेश मंडळांकडून गणरायाच्या स्वागताची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने गणेशोत्सवासाठी स्वतंत्र व्यवस्था उभी केली असून मंडप परवानग्या, विसर्जन व्यवस्था आणि नागरिकांच्या सुविधांवर प्रशासनाचा भर आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबईतील गर्दी लक्षात घेऊन सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेलाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. मुंबई मेट्रो वनने १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान सेवा वेळेत वाढ केली असून रात्री उशिरापर्यंत भाविकांना प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. मुंबई पोलिसांनीही गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे. उत्सव काळात कायदा-सुव्यवस्था आणि नागरिकांची सुरक्षितता यासाठी विशेष उपाययोजना करण्यात येत आहेत.

# महापालिका आयुक्त उतरले रस्त्यावर

## १५ दिवसांत प्रमुख रस्ते दुरुस्तीचे लक्ष्य; भूसंपादनही तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे शहरातील विविध भागातील विकासकामे प्रलंबित असून वारंवार सांगूनही महापालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आल्याचा आरोप नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेत केला होता. प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत सभासदांनी कडक शब्दात सुनावले होते.**



या पार्श्वभूमीवर आता महापालिका आयुक्त सक्रिय झाले असून रस्त्यावर उतरून विविध भागात पाहणी करण्यास आयुक्त नवल किशोर राम यांनी सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून आयुक्त राम यांनी येरवडा क्षेत्रीय कार्यालय परिसरातील रखडलेली विकासकामे, मिसिंग लिंक, भूसंपादन आणि स्वच्छतेच्या कामांची पाहणी केली. यामुळे या रखडलेल्या कामांना आता गती मिळणार आहे. या परिसरातील विविध विकासकामांची पाहणी करत प्रमुख रस्त्यांची दुरुस्ती येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचा आदेश आयुक्त राम यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला.

शहरातील विविध भागातील विकासकामे रखडलेली असून महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नगरसेवकांकडून केला जातो. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत देखील सभासदांकडून रखडलेल्या कामाबाबत विचारणा करण्यात आली. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त राम यांनी विविध क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन तेथील कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे.

येरवडा क्षेत्रीय कार्यालय परिसरातील सुरू असलेल्या तसेच प्रस्तावित विकासकामांचा शनिवारी आढावा घेण्यात आला. रस्ते दुरुस्ती, देखभाल, वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या मिसिंग लिंक, भूसंपादन आणि नागरिकांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची माहिती त्यांनी घेतली. यावेळी उपायुक्त आशा राऊत, घनकचरा विभागाचे उपायुक्त संतोष वारुळे, पथ विभागाचे अधीक्षक अभियंता रोहिदास गव्हाणे आदी उपस्थित होते.

शिवणे-खराडी नदीकाठच्या रस्त्यावरील मिसिंग लिंक, ग्रँट रोड-नगर रस्त्यावरील जंक्शनजवळील रस्ता रुंदीकरण, वडगावशेरी नदीकाठच्या रस्त्यावरील मिसिंग लिंक आणि वाघोलीतील प्रस्तावित १८ मीटर रुंदीच्या उत्तर-दक्षिण रस्त्याच्या मिसिंग लिंक कामाची माहिती यावेळी आयुक्तांनी घेतली.

काही प्रकल्प भूसंपादनाच्या अडचणींमुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. अर्थसंकल्पात तरतूद असलेल्या प्रमुख रस्ते आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांचे भूसंपादन तातडीने पूर्ण करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले.

### हरित जागांचा विस्तार करण्याच्या सूचना

वाघोली परिसरातील नाला गार्डनची पाहणी करताना आयुक्तांनी नैसर्गिक घटकांचा योग्य वापर करून विकसित केलेल्या जागेचे कौतुक केले. महापालिकेच्या उपलब्ध जागांचा योग्य वापर करून नागरिकांसाठी अशाच हरित जागा विकसित करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. अशा जागा शहराच्या पर्यावरणीय समतोलासाठी ‘शहराची फुफ्फुसे’ म्हणून महत्त्वपूर्ण ठरू शकतात, असे आयुक्तांनी नमूद केले.

# कोरेगाव भीमा येथील जयस्तंभ परिसरातील जमिनीचा ताबा जमादार कुटुंबाकडेच

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील हवेली तालुक्यातील पेरणे येथील ऐतिहासिक ‘जयस्तंभ’ आणि लगतच्या सुमारे ९.२५ एकर जमिनीचा ताबा जमादार-माळवदकर कुटुंबाकडेच कायम ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निकाल पुणे दिवाणी न्यायालयाने दिला आहे. कायदेशीर प्रक्रियेशिवाय या कुटुंबाचा ताबा हिरावून घेण्यास किंवा त्यांना बेदखल करण्यास न्यायालयाने राज्य शासनाला कायमस्वरूपी मनाई केली आहे. संयुक्त दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) अमोल शिंदे यांनी शुक्रवारी यासंदर्भातील आदेश जारी केले.**





ऐतिहासिक नोंदींनुसार, १ जानेवारी १८१८ रोजी झालेल्या भीमा कोरेगावच्या लढाईत पेशव्यांविरुद्ध लढलेल्या आपल्या सैनिकांच्या स्मरणार्थ ब्रिटिश सरकारने १८२२ मध्ये या ‘जयस्तंभा’ची उभारणी केली होती. या लढाईत जखमी झालेले ब्रिटिश सैनिक खंडोजीबीन गजोजी जमादार यांची १३ डिसेंबर १८२४ रोजी ब्रिटिश सरकारने जयस्तंभाचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली होती.

ब्रिटिशांनी त्यांना एक सनद बहाल करून, जोपर्यंत कुटुंबात पुरुष वारसदार आहेत, तोपर्यंत जयस्तंभासह सुमारे २६० एकर जमिनीचा ताबा जमादार कुटुंबाकडे दिला होता. खंडोजींचे सहावे वंशज आणि भारतीय लष्करातून निवृत्त झालेले कॅप्टन बाळासाहेब जमादार-माळवदकर यांनी या सनदेची मूळ प्रत व अन्य पुरावे न्यायालयात सादर केले होते.

कनिष्ठ न्यायालयाने यापूर्वी दिलेली स्थगिती उच्च न्यायालयाने कायम ठेवत, १७ सप्टेंबर २०२५ रोजी या खटल्याची सुनावणी जलदगतीने घेऊन वर्षभरात निकाल देण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर १७ जुलै २०२६ रोजी न्यायालयाने या दाव्यातून ‘बार्टी’ आणि ‘विजयस्तंभ संरक्षण समिती’ यांना वगळले. जमादार यांच्या बाजूने ॲड. हेमंत भोपटकर आणि खंडोजी जमादार यांचे वंशज असलेले ॲड. रोहन जमादार-माळवदकर यांनी बाजू मांडली.

शुक्रवारी न्यायालयाने निकाल देताना स्पष्ट केले की, प्रतिवादी (राज्य सरकार) किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय वादींच्या (नामदेव जमादार यांचे वारसदार आणि अशोक जमादार) ताब्याला बाधा आणू नये किंवा त्यांना निष्कासित करू नये. तांत्रिक कारणांमुळे कॅप्टन बाळासाहेब जमादार यांचा वैयक्तिक दावा न्यायालयाने फेटाळला असला, तरी उर्वरित वादींच्या बाजूने निकाल दिला आहे.

या निकालाबाबत बोलताना ॲड. रोहन जमादार म्हणाले, “हा निकाल जमादार-माळवदकर कुटुंबाच्या बाजूने लागला आहे. १८२४ चा ब्रिटिश आदेश, १८२६ चा न्यायालयाचा आदेश आणि इतर कागदपत्रांच्या आधारे आमचा ताबा सिद्ध झाला आहे. कॅप्टन बाळासाहेब यांचा दावा फेटाळला जाणे ही केवळ तांत्रिक बाब असून सातबारा उताऱ्यावर त्यांचे नाव नोंदवण्याचा अर्ज महसूल न्यायालयात प्रलंबित आहे.”

### नेमका वाद काय होता?

सप्टेंबर २०१५ मध्ये ‘भीमा कोरेगाव विजयस्तंभ संरक्षण आणि संवर्धन समिती’ या खासगी संस्थेने तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांना पत्र लिहिले होते. जयस्तंभाच्या लगतच्या जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर जमादार कुटुंबाचे नाव ‘बेकायदेशीरपणे’ नोंदवले गेले असल्याचा आरोप समितीने केला. सातबारा उतारावरून कुटुंबाचे नाव काढावे तसेच या जागेवरील अतिक्रमण हटवावे, अशी मागणी समितीने केली होती. दरवर्षी १ जानेवारीला येथे जमणाऱ्या लाखो आंबेडकरी अनुयायांना अपुऱ्या जागेमुळे अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही समितीने नमूद केले होते. मंत्र्यांच्या निर्देशानंतर तत्कालीन समाजकल्याण विभाग, ‘बार्टी’ (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था) आणि जिल्हा प्रशासनाकडून कुटुंबाची घरे, शेड आणि शेतमाल हटवण्याच्या हालचाली सुरू झाल्या. या कारवाईविरोधात कॅप्टन बाळासाहेब जमादार, नामदेव जमादार आणि अशोक जमादार यांनी एप्रिल २०१७ मध्ये राज्य शासन, बार्टी आणि समितीविरोधात दिवाणी न्यायालयात दावा दाखल करून कायमस्वरूपी मनाईहुकुमाची मागणी केली होती. दरम्यान, २०२१ मध्ये नामदेव जमादार यांचे निधन झाले.

# गणेशोत्सवात शहरात जड वाहनांना 'नो एन्ट्री'

## भोसरी, चिखली, वाकड, निगडी, हिंजवडीसह प्रमुख मार्गांवर प्रवेशबंदी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**गणेशोत्सव आणि गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी विविध मार्गांवर तात्पुरते वाहतूक बदल लागू केले आहेत. भोसरी, चिखली, तळेगाव, सांगवी, वाकड, निगडी, हिंजवडी आणि पिंपरी वाहतूक विभागांतर्गत प्रमुख रस्त्यांवर वाहनांना प्रवेशबंदी करून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ही अधिसूचना १२ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.**



### १२ दिवस वाहतूक बदल

१४ ते २५ सप्टेंबरदरम्यान गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध मार्गांवर वाहतूक निर्बंध राहणार आहेत. परिस्थितीनुसार निर्बंधांच्या कालावधीत वाढ किंवा अतिरिक्त बदलही केले जाऊ शकतात.

अधिसूचनेनुसार १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबरदरम्यान, परिस्थितीनुसार विविध ठिकाणी वाहतूक निर्बंध लागू राहणार आहेत. अनेक मार्गांवर दुपारी ४ ते रात्री १२ वाजेपर्यंत, तर काही ठिकाणी सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत वाहतूक बंद किंवा वळविण्यात येणार आहे.

भोसरी विभागात हॅरिस ब्रिज, फुगेवाडी, दापोडी, भोसरी उड्डाणपूल परिसरातील काही मार्गांवर प्रवेशबंदी करण्यात येणार असून वाहनांना पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे. चिखली विभागात मोशी, भारतमाता चौक, बोऱ्हाडेवाडी तसेच बो-हाडेवाडी चौक परिसरात वाहतूक बदल करण्यात आले आहेत.

तळेगाव विभागात तळेगाव, इंद्रायणी कॉलेज, चाकण बाजूकडील मार्ग तसेच मावळ परिसरातील काही रस्त्यांवर निर्बंध राहतील. सांगवी विभागात महेश्वरी चौक, माकण, जुनी सांगवी, साई चौक, कृष्णा चौक, शितोळे पेट्रोल पंप आदी परिसरात वाहतूक वळविण्यात येणार आहे.

वाकड, निगडी आणि हिंजवडी विभागातही दत्तमंदिर रोड, वाकड, आकुर्डी, दळवीनगर, जांबवडेकर चौक, टाटा जंक्शन, लक्ष्मी चौक आदी प्रमुख मार्गांवर वाहतूक नियंत्रणाचे नियोजन करण्यात आले आहे. वाहनचालकांनी पोलिसांनी सुचविलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पिंपरी विभागात पवनानगर, सर्जा हॉटेल, काळेवाडी पूल, डिलक्स चौक, कराची चौक, पिंपरी पूल, साई चौक आदी परिसरातील वाहतुकीत बदल करण्यात येणार आहेत. गणेश विसर्जनाच्या वेळी गर्दी वाढल्यास परिस्थितीनुसार अतिरिक्त निर्बंध लागू करण्याचे अधिकार वाहतूक पोलिसांनी राखून ठेवले आहेत.

वाहतूक बदलाच्या कालावधीत अत्यावश्यक सेवेतील वाहनांना परिस्थितीनुसार प्रवेश देण्यात येईल. नागरिकांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करून पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. गणेशोत्सव काळात घराबाहेर पडण्यापूर्वी वाहतूक बदल लक्षात घ्या; अन्यथा प्रवासात अडथळे येण्याची शक्यता आहे.

# महापालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांना ओळखपत्र सक्ती!



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कार्यालयीन वेळेत अधिकृत ओळखपत्र दर्शनी भागावर लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पुन्हा आदेश काढला असून, नियमाचे पालन न करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.**

### आदेशाची पुन्हा अंमलबजावणी

महापालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांना ओळखपत्र लावण्याच्या सूचना यापूर्वीही देण्यात आल्या होत्या. मात्र, त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने आयुक्तांनी पुन्हा आदेश काढला आहे.

### विभागप्रमुखांची जबाबदारी

कार्यालयीन वेळेत अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र लावले आहे की नाही, याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. नियमभंग झाल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

### साईट व्हिजिटवरही लक्ष

साईट व्हिजिटच्या नावाखाली खासगी कामे करणे तसेच कार्यालयीन वेळेत खासगी कार्यक्रमांना उपस्थित राहण्याच्या तक्रारी प्रशासनाकडे आल्या आहेत. त्यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कामकाजावरही प्रशासनाचे लक्ष राहणार आहे.

### विभागप्रमुखांची जबाबदारी

कार्यालयीन वेळेत अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र लावले आहे की नाही, याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. नियमभंग झाल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

महापालिकेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांची ओळख स्पष्ट व्हावी, यासाठी यापूर्वीही ओळखपत्र परिधान करण्याचे आदेश देण्यात आले होते. तत्कालीन आयुक्त श्रीकर परदेशी यांच्या कार्यकाळात या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी झाली होती. मात्र, त्यानंतर अनेक अधिकारी-कर्मचारी ओळखपत्र तसेच निर्धारित गणवेशाबाबत टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

कार्यालयीन वेळेत काही कर्मचारी कॅन्टीनमध्ये बसून गप्पा मारणे, साईट व्हिजिटच्या नावाखाली खासगी कामे करणे किंवा खासगी कार्यक्रमांना उपस्थित राहणे, अशा तक्रारीही प्रशासनाकडे आल्या आहेत. त्यामुळे अधिकारी-कर्मचाऱ्यांची ओळख आणि त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुन्हा ओळखपत्र सक्ती करण्यात आली आहे.

नव्या आदेशानुसार, महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये प्रवेश करताना तसेच कार्यालयीन वेळेत अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अधिकृत ओळखपत्र दर्शनी भागावर लावणे आवश्यक आहे. संबंधित विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र परिधान केले आहे की नाही, याची नियमितपणे खात्री करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. ओळखपत्र न लावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा आयुक्तांनी दिला आहे.

# इस्रोच्या पंखांना खासगीकरणाची कात्री?



## भूमिका

**भारताच्या अंतराळ प्रवासाची सुरुवात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झाली. २१ नोव्हेंबर १९६३ रोजी थुंबा येथून पहिले रॉकेट अवकाशात झेपावले, तेव्हा कार्यालय चर्चमध्ये होते आणि रॉकेटचा भाग सायकलवरून नेण्याची वेळ वैज्ञानिकांवर आली होती. त्यातून उभी राहिलेली 'इस्रो' आज जगातील मानाची अंतराळ संस्था बनली आहे.**




त्यामुळे तिच्या वाटचालीतील प्रत्येक बदल हा केवळ प्रशासकीय नसून देशाच्या वैज्ञानिक स्वाभिमानाशी जोडलेला आहे. आज खासगी क्षेत्राच्या सहभागातून अंतराळ उद्योगाला नवी गती मिळत आहे. खासगी कंपनीने कक्षीय रॉकेट प्रक्षेपित केल्याने भारताच्या अंतराळ क्षेत्रात नवा अध्याय सुरू झाला आहे. नव्या अंतराळ धोरणामुळे स्टार्टअप्सना संधी मिळाली असून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकही होत आहे.

हे निश्चितच स्वागतार्ह आहे. सरकारने संशोधन, नव्या तंत्रज्ञानाचा विकास आणि महत्त्वाकांक्षी मोहिमा यावर लक्ष केंद्रित करावे, तर व्यावसायिक कामे खासगी क्षेत्राने करावीत, हा विचार वरकरणी व्यवहार्य वाटतो. मात्र प्रश्न खासगी क्षेत्राच्या सहभागाचा नाही; प्रश्न आहे तो 'इस्रो'च्या मूलभूत क्षमतेचा. रॉकेट निर्मिती आणि प्रक्षेपणासारखी कौशल्ये हळूहळू खासगी कंपन्यांकडे गेली, तर भविष्यात इस्रोची स्वयंपूर्णता कमी होणार नाही का? तंत्रज्ञान विकसित करणारी संस्था आणि ते प्रत्यक्षात वापरणाऱ्या व्यावसायिक कंपन्या यांच्यातील संतुलन बिघडले, तर त्याचा परिणाम देशाच्या दीर्घकालीन अंतराळ क्षमतेवर होऊ शकतो. इस्रो ही केवळ सरकारी संस्था नाही. ती भारतीयांच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहे. चांद्रयान, मंगळयान, आदित्य यांसारख्या मोहिमांनी सामान्य भारतीयांच्या मनात विज्ञानाबद्दल अभिमान निर्माण केला.

मर्यादित साधनसामग्रीत, काटकसरीने आणि देशासाठी काहीतरी मोठे करण्याच्या जिद्दीने वैज्ञानिकांनी ही कामगिरी उभी केली. त्यामुळे इस्रोतील वैज्ञानिकांची प्रेरणा केवळ पगार, सुविधा किंवा करिअरच्या संधींमध्ये मोजता येणार नाही. याच पार्श्वभूमीवर गगनयान मोहिमेचा विलंब अस्वस्थ करणारा आहे. मानवी अंतराळ मोहिमेची घोषणा झाली, त्याला अनेक वर्षे झाली; तरी महत्त्वाचे चाचणी टप्पे पूर्ण व्हायचे आहेत. भारतीय अंतराळ स्थानकाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्टी समोर आहे. एकीकडे खासगी अंतराळ उद्योगासाठी अब्जावधींची गुंतवणूक आकर्षित होत असताना, देशाच्या स्वतःच्या अंतराळ कार्यक्रमांची गती कमी राहणे ही विसंगती आहे.

खासगी कंपन्यांना संधी द्यायलाच हवी; पण इस्रोची किंमत कमी करून नव्हे. संशोधन, मूलभूत तंत्रज्ञान, धोरणात्मक क्षमता आणि अत्यंत महत्त्वाच्या प्रक्षेपणांमध्ये इस्रोची निर्णायक भूमिका कायम राहिली पाहिजे. खासगीकरण म्हणजे सरकारी संस्थेचे हात बांधणे नव्हे, तर तिचे सामर्थ्य वाढवणे असले पाहिजे. गुंतवणूकदारांचा परतावा महत्त्वाचा असला, तरी देशाचा वैज्ञानिक स्वाभिमान त्याहून मोठा आहे. इस्रोचे पंख विस्तारले पाहिजेत; त्यांना कात्री लावली जाता कामा नये.

## प्रासंगिक »

### हरवलेली अंगठी

**एका गावात सुमन नावाची वृद्ध महिला राहत होती. एके दिवशी तिची सोन्याची अंगठी घराच्या अंगणात कुठेतरी हरवली. तिने बराच वेळ शोध घेतला, पण अंगठी सापडली नाही. शेजारचा रोहन तिच्या मदतीला आला.**

दोघांनी संपूर्ण अंगण तपासले. अचानक रोहन म्हणाला, "आजी, आपण जिथे शेवटचा शोध घेतला होता, तिथे पुन्हा पाहूया." सुमन म्हणाली, "तिथे तर मी आधीच पाहिले आहे." तरीही रोहनने शांतपणे पुन्हा त्या जागेची माती बाजूला केली.

काही क्षणांत त्याला अंगठी सापडली.सुमनला आश्चर्य वाटले. ती म्हणाली, "मी तिथे पाहूनही मला ती का दिसली नाही?" रोहन हसून म्हणाला, "कधी कधी वस्तू आपल्या डोळ्यांसमोर असते; पण घाईमुळे आपले लक्ष तिच्या-कडे जात नाही."

सुमनने त्याचे कौतुक केले आणि म्हणाली, "आज तू मला अंगठीपेक्षा मोठी गोष्ट शिकवलीस."

- तात्पर्य : घाईपेक्षा संयम आणि बारकाईने केलेला प्रयत्न अधिक फलदायी ठरतो.

जग सध्या युद्ध, आर्थिक अस्थिरता आणि बदलत्या सामरिक समीकरणांच्या भोवऱ्यात सापडले आहे. अमेरिका-इराण संघर्ष, युक्रेन युद्ध आणि पश्चिम आशियातील वाढता तणाव या पार्श्वभूमीवर भारतात होत असलेली ब्रिक्स परिषद विशेष महत्त्वाची ठरते.

### पुतीन-जिनपिंग भेटीत भारताची मुत्सद्देगिरीची कसोटी



रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भारतातील उपस्थिती ही केवळ औपचारिक राजनैतिक घटना नसून बदलत्या जागतिक व्यवस्थेचे संकेत देणारी घडामोड आहे. रशियाने युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर पुतीन यांचा भारत दौरा आणि गलवान संघर्षानंतर जिनपिंग यांचा भारत दौरा यांना स्वतंत्र महत्त्व आहे. भारताने या दोन्ही देशांशी संबंध कायम ठेवले आहेत. एकीकडे रशियाशी संरक्षण, ऊर्जा आणि सामरिक सहकार्य आहे, तर दुसरीकडे चीनशी सीमावाद आणि व्यापारातील गुंतागुंत आहे. त्यामुळे दोन्ही देशांच्या प्रमुखांशी संवाद साधताना भारताला अत्यंत सावध आणि संतुलित भूमिका घ्यावी लागणार आहे. ब्रिक्सच्या विस्तारामुळे विकसनशील देशांना जागतिक राजकारणात अधिक प्रभावी व्यासपीठ मिळत आहे.

ऊर्जा, अन्नसुरक्षा, पुरवठा साखळी, व्यापार आणि आर्थिक सहकार्य यांसारखे विषय महत्त्वाचे असले, तरी त्यामागील भू-राजकीय संदेश अधिक मोठा आहे. डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याच्या चर्चेलाही या परिषदेमुळे वेग मिळू शकतो. मात्र भारताने अशा कोणत्याही प्रक्रियेत घाईने सहभागी होण्याऐवजी आपल्या आर्थिक आणि सामरिक हितांचा विचार करणे आवश्यक आहे. भारताची खरी ताकद त्याच्या स्वतंत्र परराष्ट्र धोरणात आहे. अमेरिका आणि युरोपशी संबंध मजबूत ठेवतानाच रशिया, इराण, आखाती देश आणि चीनशीही संवादाचे दरवाजे खुले ठेवण्याची क्षमता भारताने दाखवली आहे. हीच भूमिका पुढेही कायम ठेवणे गरजेचे आहे. कोणत्याही एका गटाच्या दबावाखाली झुकणे भारताच्या हिताचे ठरणार नाही.

विशेषतः इराणच्या प्रश्नावर भारतासमोर मोठी कसोटी आहे. पश्चिम आशियातील संघर्षाचा थेट परिणाम ऊर्जा पुरवठा, व्यापार आणि भारतीय नागरिकांच्या सुरक्षिततेवर होतो. त्यामुळे शांततेचे आवाहन करण्याबरोबरच भारताला आपल्या आर्थिक हितांचेही संरक्षण करावे लागेल. ब्रिक्स परिषद भारतासाठी केवळ पाहुणचाराची संधी नाही; ती मुत्सद्देगिरीची परीक्षा आहे. पुतीन आणि जिनपिंग यांच्याशी संवाद साधताना भारताने कोणाच्याही विरोधात उभे राहण्याऐवजी स्वतःच्या हितासाठी उभे राहिले पाहिजे. बदलत्या जगात भारताची भूमिका 'कुणाच्या बाजूने' अशी नसून 'भारताच्या बाजूने' असणे हीच खरी संतुलित मुत्सद्देगिरी ठरेल.

## ।। अभंगवाणी ।।



सुख पाहतां जवापाडें ।
दुःख पर्वता एवढें ॥१॥

धरीं धरीं आठवण ।
मानीं संताचें वचन ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# राजापूर पन्हाळीच्या जंगलात कंटेनरवर छापा

## तब्बल १ कोटी ९१ लाख ९६ हजारांचा गोवा बनावटीचा मद्यसाठा व कंटेनर जप्त

**महाईन्यूज । रत्नागिरी**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गोवा राज्यातून महाराष्ट्रात होणाऱ्या बेकायदेशीर मद्यतस्करीला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने मोठी कारवाई केली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील राजापूर तालुक्यातील पन्हाळी तर्फे सौंदळ येथे जंगलमय भागात लपवून ठेवलेल्या बारा चाकी कंटेनरवर छापा टाकत तब्बल १ कोटी ९१ लाख ९६ हजार रुपये किमतीचा गोवा बनावटीचा बेकायदेशीर दारूसाठा आणि कंटेनर जप्त करण्यात आला.**




मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६ वरील पन्हाळी येथील हॉटेल समर्थजवळ, गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यालगतच्या जंगलात हा कंटेनर संशयास्पदरीत्या लपवून ठेवण्यात आला होता. गुप्त माहितीच्या आधारे उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने सापळा रचून ही धडक कारवाई केली.

छाप्यात कंटेनरची झडती घेतली असता महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधित असलेल्या 'रॉयल ब्लू माल्ट व्हिस्की' या ब्रँडचा तब्बल १६०० पुठ्ठ्यांचा साठा आढळून आला. यामध्ये एकूण १३,८२४ बल्क लिटर मद्य असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. या अवैध दारूसाठ्याची किंमत तब्बल १ कोटी ६८ लाख ९६ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

कारवाईदरम्यान कंटेनरवर प्रथमदर्शनी राजस्थानचा आरजे १४ जी आर ६००४ हा क्रमांक असलेली नंबर प्लेट लावण्यात आल्याचे आढळले. मात्र अधिक तपासणी केली असता या नंबर प्लेटखाली वाहनाचा मूळ क्रमांक एचआर ६९ ई ३४९० असल्याचे उघड झाले. त्यामुळे अवैध मद्याची वाहतूक करण्यासाठी बनावट नंबर प्लेटचा वापर करून यंत्रणेला चकवा देण्याचा प्रयत्न झाल्याचे स्पष्ट झाले.

दरम्यान, उत्पादन शुल्क पथकाची चाहूल लागताच कंटेनर चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. फरार चालकाविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ मधील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्याचा शोध सुरू आहे.

गणेशोत्सवाच्या काळात कोकणात मोठ्या प्रमाणावर चाकरमानी दाखल होत असताना अवैध मद्याची वाहतूक आणि विक्री वाढण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर उत्पादन शुल्क विभागाने महामार्गावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पन्हाळी येथील ही कारवाई त्याच मोहिमेतील मोठी कामगिरी मानली जात आहे.

### जंगलात दडवलेला मद्यसाठा उघड

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, विभागीय उपायुक्त स्नेहलता श्रीकर आणि रत्नागिरी अधीक्षक कीर्ती शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भरारी पथकाचे निरीक्षक अमित पाडळकर, दुय्यम निरीक्षक प्रदीप गुरव तसेच जवान अतुल वसावे, विशाल विचारे, मानस पवार आणि अनुराग बर्वे यांनी केली. गणेशोत्सवाच्या तोंडावर महामार्गालगत जंगलात लपवून ठेवलेला कोट्यवधी रुपयांचा मद्यसाठा उघडकीस आल्याने अवैध मद्यतस्करांचे धाबे दणाणले आहेत.

# पुणे-बंगळूर महामार्गावर सलग दुसऱ्या दिवशी कोंडीचा फेरा; प्रवाशांचे भीषण हाल

**महाईन्यूज । सातारा**

**गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या चाकरमान्यांच्या गर्दीमुळे पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर आज सलग दुसऱ्या दिवशीही भीषण वाहतूक कोंडी पाहायला मिळाली. शनिवारच्या कोंडीनंतर प्रशासनाकडून वाहतूक सुरळीत पाडण्याचे दावे केले जात असले, तरी प्रत्यक्षात आज परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. पुन्हा एकदा खंबाटकी घाट आणि आनेवाडी टोलनाक्यावर वाहनांच्या अनेक किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्याने चालक आणि प्रवासी तासनतास चक्काजाममध्ये अडकून पडले आहेत.**



महामार्गावरील शिरवळ, खंडाळा ते थेट आनेवाडी टोलनाक्यापर्यंतचा पुढे सातारा परिसर गाड्यांच्या भल्यामोठ्या ताफ्याने ठप्प झाला आहे. घाटातील अवघड वळणे आणि सेवा रस्त्यावरही वाढलेली अतिक्रमणे यामुळे वाहतुकीचा वेग प्रचंड मंदावला आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना पाण्याच्या अन् अन्नाच्या तुटवड्यामुळे अतोनात यातना सहन कराव्या लागत आहेत.

स्वारगेट आणि कात्रज बस स्थानकांवर प्रवाशांची अभूतपूर्व गर्दी उसळली आहे. एसटीची पुरेशी उपलब्धता नसल्याने खाजगी ट्रॅव्हल्स आणि मोटार चालकांनी प्रवाशांच्या हतबलतेचा पूर्ण फायदा घेतला आहे. नेहमीपेक्षा दुप्पट-तिप्पट दराने अवास्तव भाडेवसुली केली जात असून, पुणे ते सातारा आणि महाबळेश्वर प्रवासासाठी ६०० ते ८०० रुपयांपर्यंतची मनमानी आकारणी सुरू आहे.

### टोलमाफीच्या घोषणेचा फज्जा!

शासनाने गणेशभक्तांसाठी जाहीर केलेल्या टोलमाफीची अंमलबजावणी आनेवाडी टोलनाक्यावर पूर्णपणे कोलमडली आहे. नाक्यावर टोलमुक्तीचे नियोजन कोलमडल्याने गाड्या थांबवून ठेवल्या जात आहेत, ज्यामुळे सुमारे २ ते ३ किलोमीटरच्या रांगा लागल्या आहेत. "शासनाने कागदावर टोलमाफी जाहीर केली, पण प्रत्यक्षात नाक्यावर अर्धातास अडकून पडावे लागत आहे. ही गणेशभक्तांची उघड फसवणूक आहे," असा तीव्र संताप प्रवासी व्यक्त करत आहेत.दरम्यान, महामार्ग पोलिसांकडून भोर-मांढरदेवी-वाई या पर्यायी मार्गाने वाहतूक वळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत; मात्र वाहनांचा प्रचंड ओघ पाहता हा दिलासा तुटपुंजा ठरत आहे.

# तंत्रज्ञान अन् खनिजांचं शस्त्रास्त्रीकरण थांबवा!

## ब्रिक्स परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा जगाला मोठा इशारा

महाईन्यूज । नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिक्स शिखर परिषदेच्या समारोप भाषणात सदस्य देशांमधील लवचिकता वाढवण्याच्या गरजेवर भर दिला, तसंच महत्त्वपूर्ण खनिजांचं शस्त्रास्त्रांसारखा होणारा वापर सामायिक विकासात अडथळे आणू शकतात, असा इशारा दिला.**



"तंत्रज्ञान आणि महत्त्वपूर्ण खनिजांचं शस्त्रास्त्रांसारखा वापर आपल्या सामायिक प्रगतीला बाधा आणू शकतात. म्हणूनच, आपण तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना सर्वसमावेशकतेवर भर दिला आहे", असं पंतप्रधान मोदी यांनी 'लवचिकता, नवोपक्रम, सहकार्य आणि शाश्वतता' या विषयावरील ब्रिक्स सत्रात सांगितलं.

"भारताच्या अध्यक्षतेखाली आम्ही आमचे सर्व प्रयत्न लवचिकता, नवोपक्रम, सहकार्य आणि शाश्वतता या चार स्तंभांवर केंद्रित केले आहेत. मला आनंद आहे की, तुमच्या सहकार्याने आणि पाठिंब्याने आम्ही आमच्या सामायिक दृष्टिकोनाला सर्वांसाठी फायदेशीर सहकार्यामध्ये बदलू शकलो आहोत."

आज जगात तणावाच्या घटना सातत्याने वाढत आहेत आणि त्यांचा सामान्य लोकांच्या जीवनावर अत्यंत नकारात्मक आणि व्यापक परिणाम होत आहे. महामारी, हवामान आपत्ती आणि पुरवठा साखळीतील विस्कळीतपणा यावरून हे स्पष्ट झालं आहे की, आजच्या परस्परांशी जोडलेल्या जगात कोणतेही संकट एका क्षेत्रापुरतं मर्यादित राहत नाही.

आम्ही ब्रिक्स समूहामध्ये लवचिकता मजबूत करण्यावर विशेष भर दिला आहे. आव्हानांची वेळेत ओळख पटवणे, त्यासाठी स्वतःला तयार करणे आणि त्वरित पावलं उचलणे तितकंच महत्त्वाचं आहे. याच दृष्टिकोनातून, संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध आणि त्यावरील उपायांसाठी एकात्मिक ब्रिक्स पूर्वसूचना प्रणालीवर सहमती झाली आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी पूर्वसूचना डेटा एकत्रीकरण मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली आहेत. 'ब्रिक्स लॉजिस्टिक सप्लाय चेन कोऑपरेशन फ्रेमवर्क' आपली पुरवठा साखळी अधिक विश्वासार्ह आणि लवचिक बनवण्यास मदत करेल.

भारताने मैत्री, सहभाग आणि सहकार्य वाढवण्यासाठी ब्रिक्स मंचाचा वापर केला आहे. ब्रिक्समधील सहकार्य केवळ सरकारांपुरते मर्यादित राहू नये, असा आमचा प्रयत्न राहिला आहे. आपले उद्योजक, शेतकरी, संशोधक, महिला, तरुण आणि सामान्य नागरिकही यात सक्रिय सहभागी झाले पाहिजेत. 'ब्रिक्स कनेक्ट'च्या माध्यमातून आम्ही कौशल्ये, महिलांचा कार्यबलातील सहभाग, सामाजिक सुरक्षा आणि क्षमता बांधणीला प्रोत्साहन दिले आहे. लहान उद्योजकांना ज्ञान, वित्त आणि नवीन बाजारपेठांशी जोडण्यासाठी आम्ही 'ब्रिक्स एमएसएमई सहकार्य पोर्टल' सुरू केले आहे. आपल्या शहरांमधील सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण सुलभ करण्यासाठी 'ब्रिक्स अर्बन मोबिलिटी हब'ची स्थापना करण्यात आली आहे.

आम्ही मानवी विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखण्याच्या गरजेवर भर दिला आहे. हाच शाश्वततेचा पाया आहे. भावी पिढ्यांप्रती ही आपली जबाबदारीही आहे. या दिशेने आम्ही अनेक उपक्रमांवर प्रगती केली आहे. आम्ही स्मार्ट ग्रिड आणि ऊर्जा साठवणुकीसाठी 'ब्रिक्स डिजिटल सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन केले आहे. हे आपल्या स्वच्छ ऊर्जा यंत्रणांना अधिक विश्वासार्ह, कार्यक्षम आणि सुलभ बनवण्यास मदत करेल. कृषी-पर्यावरणशास्त्र आणि पुनरुत्पादक शेती यावरील उत्कृष्टतेची केंद्रे पारंपारिक ज्ञानाला आधुनिक विज्ञानाशी जोडतील. समुदाय-आधारित हवामान अनुकूलनासाठी विकसित केलेली तत्त्वे स्थानिक ज्ञानाला हवामान कृतीचा एक महत्त्वाचा पाया बनवतील.


### साधनांच्या शस्त्रास्त्रीकरणाविरुद्ध इशारा

नवोपक्रमांतर्गत, 'ब्रिक्स इनक्यूबेटर नेटवर्क' आपल्या स्टार्टअप्स आणि इनक्यूबेटर्सना जोडेल. नाविन्यपूर्ण आणि वाढवण्यायोग्य उपायांना चालना देण्यासाठी आम्ही 'ब्रिक्स स्टार्टअप इनोव्हेशन फंड'चा प्रस्ताव दिला आहे. डिजिटल शेतीवरील ब्रिक्स नेटवर्क शेतकऱ्यांसाठी नवीन संधी निर्माण करेल. या नेटवर्कच्या माध्यमातून एआय (AI), भू-स्थानिक तंत्रज्ञान आणि डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर हे शेतकऱ्यांच्या वास्तविक गरजांशी जोडलं जाईल. तंत्रज्ञान आणि महत्त्वपूर्ण खनिजांचं शस्त्रास्त्रीकरण आपल्या सामायिक प्रगतीला खीळ घालू शकते. म्हणूनच, आम्ही तंत्रज्ञानाचा स्वीकार करताना सर्वसमावेशकतेवर भर दिला आहे.

# पाकिस्तानच्या दहशतवादावर मलेशियाच्या पंतप्रधानांनी बाळगलं मौन

महाईन्यूज । नवी दिल्ली

**मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी गाझामधील इस्रायलच्या कारवाईला राज्य पुरस्कृत दहशतवाद म्हटलं आहे, परंतु पाकिस्तानच्या बाबतीत हाच निकष लावण्यास आणि भारताच्या या शेजारी देशाला दहशतवादाचा राज्य पुरस्कृत प्रायोजक म्हणण्यास त्यांनी नकार दिला आहे. 'एनडीटीव्ही' ला दिलेल्या एका विशेष मुलाखतीत ते बोलत होते.**



इब्राहिम यांनी गाझामधील हमासविरुद्धच्या इस्रायली कारवायांचा तीव्र शब्दात निषेध केला, परंतु भारताच्या विरोधातील पाकिस्तानच्या दहशतवादी धोरणाचा उल्लेख आला तेव्हा मात्र त्यांच्याकडे शब्दांची कमतरता जाणवली. ब्रिक्स (BRICS) शिखर परिषदेसाठी भारतात आलेले इब्राहिम यांनी, इस्रायलकडून पॅलेस्टाईनचे जे काही चालले आहे ते त्यांनी वसाहतीकरण संबोधत ते थांबवण्याची मागणी केली. "हमास संघटना फक्त २० वर्षे जुनी आहे. परंतु पॅलेस्टाईनचे वसाहतीकरण ७० वर्षे जुने आहे. आम्हाला मलेशिया आणि भारतात वसाहतीकरणाचा अनुभव आहे. इस्रायलकडून पॅलेस्टाईनचे होत असलेले वसाहतीकरण आम्ही सहन करू शकत नाही", असं इब्राहिम यांनी एनडीटीव्हीशी बोलताना सांगितलं.

"सतत होणारे बॉम्बस्फोट आणि हत्या अत्यंत क्रूर आहेत. गाझामधील इस्रायलची कृती म्हणजे राज्य पुरस्कृत दहशतवाद आहे", अशी घोषणा त्यांनी केली. परंतु, जेव्हा त्यांना विचारण्यात आलं की, पाकिस्तानने गेल्या वर्षी पहलगाममध्ये जे काही केले, त्यालाही ते 'राज्य पुरस्कृत दहशतवाद' म्हणणार का? तेव्हा इब्राहिम यांनी तसं करण्यास नकार दिला. "मी इतक्या टोकापर्यंत जाणार नाही. मला माहित आहे की भारतात हे बोलणं अत्यंत संवेदनशील आहे. मी मोदीजींचा जवळचा मित्र आहे आणि आम्ही पाकिस्तानी लोकांशीही संवाद ठेवतो", असं इब्राहिम यांनी भारताच्या विरोधात पाकिस्तान दहशतवादाला खतपाणी घालत असल्याचे म्हणण्यास नकार देताना सांगितलं.

भारतात हजारो लोकांचे प्राण घेणाऱ्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाची तथ्ये आणि आकडेवारी समोर ठेवून जेव्हा त्यांना प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा इब्राहिम यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कोणत्याही गुप्तचर यंत्रणेने या दहशतवादी कारवाया पाकिस्तानच्या मार्गदर्शनाखाली झाल्याचं निश्चित केलेलं नाही. तसेच, 'दहशतवादी कृत्य झालंच नाही' असं आपलं म्हणणं नाही, असंही त्यांनी जोडलं.

# ‘काकुळ’चा अंगावर काटा आणणारा ट्रेलर




रहस्य, भय आणि सामाजिक सूडभावना यांची अनोखी सांगड घालणाऱ्या आगामी मराठी चित्रपट ‘काकुळ’चा थरारक ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटात अभिनेत्री मोनालिसा बागल मुख्य भूमिकेत झळकणार असून, तिची भूमिका यावेळी नेमकी कशी असणार, याची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये निर्माण झाली आहे.

मोनालिसा बागलने यापूर्वीही काही मराठी चित्रपटांमध्ये विविध भूमिका साकारल्या आहेत. मात्र, ‘काकुळ’मधून ती एका वेगळ्या आणि आव्हानात्मक भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार आहे. त्यामुळे तिच्या चाहत्यांसह मराठी सिनेरसिकांचेही या चित्रपटाकडे लक्ष लागले आहे.

या चित्रपटाचे दिग्दर्शन सूरज रघुनाथ पडवळ यांनी केले आहे. मोनालिसा बागलसोबत अक्षय टंकसाळे, संजय खापरे, यश डिंबळे, भूषण मंजुळे, आरती शिंदे, विवेक यादव आणि प्रकाश थिंडले हे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत.

‘काकुळ’ची कथा संग्राम या गावातील श्रीमंत आणि राजकीय वारसा लाभलेल्या तरुणाभोवती फिरते. संग्रामच्या आयुष्यात कल्पना नावाच्या तरुणीचा प्रवेश होतो आणि त्यानंतर त्याच्या आयुष्यात एकापाठोपाठ एक धक्कादायक घटना घडू लागतात. या घटनांमागे नेमकं कोणतं रहस्य दडलं आहे? कल्पना आणि संग्राम यांच्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांचा एकमेकांशी काय संबंध आहे? या प्रश्नांची उत्तरं चित्रपट पाहिल्यानंतरच मिळणार आहेत.

‘काकुळ’च्या माध्यमातून मराठी रहस्यपट आणि भयपटांच्या पारंपरिक चौकटीपेक्षा काहीतरी वेगळं मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. रहस्य आणि थरारासोबतच सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणारा अनुभव प्रेक्षकांना या चित्रपटातून मिळण्याची शक्यता आहे.



# अनित पड्डाचा ‘हुंकार’

मागील वर्षी ‘सैयारा’ चित्रपटाद्वारे प्रेक्षकांची मने जिंकणारी अनीत पड्डा आता अभिनयाच्या जगतात परतली आहे. अनीतची बहुप्रतीक्षित सीरिज ‘हुंकार’ची अधिकृत घोषणा निर्मात्यांकडून करण्यात आली आहे. तसेच हुंकारचा नवा टीझरही समोर आला आहे. निर्मात्यांनी हुंकारचे फर्स्ट लुक पोस्टर शेअर केले आहे. या सीरिजमध्ये अनीत प•ा मुख्य भूमिकेत आहे. यात ती मीनू रावत नावाची भूमिका साकारत आहे, ही युवती एका मोठ्या आणि धार्मिक व्यक्तीच्या विरोधात शारीरिक शोषणाचा गंभीर आरोप करते. हा व्यक्ती स्वत:च्या क्षेत्रातील बाहुबली असून पोलिसांचेही त्याच्यासमोर काही चालत नसते. बाप जी नाव असलेल्या या व्यक्तीच्या विरोधातील न्यायाची लढाई मीनू जिंकणार का या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्यासाठी हुंकार वेबसीरिज पहावी लागणार आहे. अनीतसोबत या सीरिजमध्ये फातिमा सना शेख, राम कपूर आणि मोहम्मद जीशान आयूब हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत दिसून येतील. हुंकार वेबसीरिज जियो हॉटस्टार या ओटीटी प्लॅटफॉर्मवर 25 सप्टेंबरपासून पाहता येणार आहे.



# ट्युलिपचा नवा प्रवास..

अभिनेत्री ट्युलिप जोशी हिची कहाणीही अशीच आहे. पहिल्याच चित्रपटातून लोकप्रियता मिळवलेल्या ट्युलिपने काही वर्षांनंतर अभिनयाला रामराम केला आणि आज ती व्यवसायासोबत वैदिक ज्योतिषाच्या क्षेत्रातही कार्यरत आहे. ट्युलिपने २००२ मध्ये ‘मेरे यार की शादी है’ या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. उदय चोप्रा आणि जिम्मी शेरगिल यांच्यासोबत ती या चित्रपटात झळकली होती. चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळाल्याने ट्युलिपला सुरुवातीलाच मोठी ओळख मिळाली. तिच्या साधेपणाने आणि अभिनयाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. पदार्पणानंतर तिच्याकडून भविष्यात मोठ्या भूमिका आणि यशस्वी कारकीर्दीची अपेक्षा केली जात होती. मात्र पहिल्या चित्रपटानंतर तिच्या करिअरला अपेक्षित वेग मिळाला नाही. तिने हिंदीसोबतच दक्षिण भारतीय आणि पंजाबी चित्रपटांमध्येही काम केले. ‘दिल मांगे मोर’, ‘धोखा’, ‘मातृभूमी’, ‘जय हो’ यांसारख्या चित्रपटांमध्ये ती दिसली. काही काळानंतर तिने छोट्या पडद्यावरही काम केले. अभिनयाच्या क्षेत्रात विविध प्रयत्न करूनही तिला पहिल्या चित्रपटासारखी लोकप्रियता पुन्हा मिळवता आली नाही. अखेर २०१५ च्या आसपास तिने अभिनय क्षेत्रापासून पूर्णपणे दूर जाण्याचा निर्णय घेतला. ट्युलिपच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचे झाल्यास तिने कॅप्टन विनोद नायर यांच्याशी लग्न केले. विनोद नायर हे सैन्यात सेवा बजावल्यानंतर व्यवसाय क्षेत्रात आले. लग्नानंतर ट्युलिपनेही पतीच्या व्यवसायात सक्रिय सहभाग घेतला. दोघांनी मिळून कन्सल्टिंग आणि मॅनेजमेंटशी संबंधित व्यवसाय उभा केला. ट्युलिप या कंपनीच्या व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे विविध अहवालांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

# राष्ट्रगीताआधी वंदे मातरम

## भारतीय क्रिकेट संघासाठी जनगणमनपूर्वी वंदे मातरम म्हणणं हा नवा अनुभव

महाईन्यूज । लंडन

**अफगाणिस्तानविरुद्धच्या पहिल्या टी२० लढतीपूर्वी भारतीय संघ एका नव्या बदलाला सामोरा गेला. केंद्र सरकारच्या नव्या निर्देशानुसार, राष्ट्रगीतापूर्वी वंदे मातरम वाजवलं जाईल. दोन देशांच्या मालिकेदरम्यान राष्ट्रगीत होतं. रविवारी होणाऱ्या लढतीपूर्वी दोन्ही संघ राष्ट्रगीतासाठी सज्ज झाले. जनगणमन सुरू होईल असं चाहत्यांना वाटलं होतं. मात्र त्याआधी वंदे मातरम सुरू झालं.**



केंद्र सरकारच्या निर्देशानुसार, वंदे मातरमची सहा कडवी वाजवण्यात येतात. टीम इंडियाच्या बहुतांश खेळाडूंना वंदे मातरमचं पहिलं कडवं पाठ होतं. मात्र पुढची कडवी पाठ नसल्याचं दिसलं. सहा कडव्यांनंतर वंदे मातरम संपलं.

प्रचंड उकाडा आणि आर्द्रता असल्यामुळे टीम इंडियाचे खेळाडू वंदे मातरम होईपर्यंत घामाघूम झाले. वंदे मातरम संपल्यानंतर आता अफगाणिस्तानचं राष्ट्रगीत सुरू होईल असं त्यांना वाटलं. पण काही सेकंदात जनगणमन सुरू झालं आणि सगळे खेळाडू सावधान पवित्र्यात राष्ट्रगीत म्हणू लागले. अनेक वर्ष सामन्यापूर्वी जनगणमन सुरू होण्याची आणि म्हणण्याची सवय असल्याने वंदे मातरम म्हणण्याचा अनुभव भारतीय खेळाडूंसाठी नवीन होता.

राजधानी दिल्लीतल्या अरुण जेटली आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर अफगाणिस्तानतर्फे टी२० मालिका आयोजित करण्यात आली आहे. भारतीय संघाची घरच्या मैदानावर पाहुणे म्हणून खेळण्याची ही पहिलीच वेळ आहे. पाहुणा संघ असल्याने भारतीय संघ पाहुण्या संघाच्या ड्रेसिंगरुममध्ये असणार आहे.

भारतीय संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला आहे. दुखापतीतून सावरत जसप्रीत बुमराह पुनरागमन करत आहे. इशान किशन सरावादरम्यान दुखापतग्रस्त झाला होता. मात्र तो अंतिम अकरात आहे. वैभव सूर्यवंशीऐवजी अनुभवी संजू सॅमसनचा संघात समावेश करण्यात आला आहे.

इब्राहिम झाद्रान अफगाणिस्तानचा नवा कर्णधार आहे. रशीद खान आणि मोहम्मद नबी हे अनुभवी शिलेदार संघात आहेत. दिल्लीत मोठ्या प्रमाणावर अफगाणिस्तानचे नागरिक राहत असल्याने इथे ही मालिका आयोजित करण्यात आली आहे.

### बुमराहनं सलामी जोडी फोडली

दिल्ली येथील अरुण जेटली स्टेडियमवर भारत-अफगाणिस्तान यांच्यातील तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना खेळवण्यात येत आहे. श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतल्यावर दुखापतीतून सावरून मैदानात उतरलेल्या जसप्रीत बुमराहने डावातील पहिल्याच षटकातील दुसऱ्या चेंडूवर अफगाणिस्तानची सलामी जोडी फोडली. अफगाणिस्तानचा सलामीवीर आणि स्टार फलंदाज रहमानुल्ला गुरबाझला त्याने खातेही न उघडता तंबूचा रस्ता दाखवला. स्लीपमध्ये अभिषेक शर्मानं त्याचा उत्तम झेल टिपला.

## इंग्लंडच्या विजयाने WTC गुणतालिकेत उलथापालथ; मालिका गमावल्यानंतर पाकिस्तान तळात

महाईन्यूज । दुबई

**इंग्लंडने एजबॅस्टन येथील तिसऱ्या कसोटी सामन्यात ८ गडी राखून दणदणीत विजय मिळवत पाकिस्तानविरुद्ध ३-० असा निर्भेळ विजय नोंदवला. यजमान इंग्लंडने ही एकतर्फी मालिका अनुक्रमे एक डाव आणि १०३ धावा, १९४ धावा आणि ८ गडी राखून आपल्या नावावर केली.**



अंतिम कसोटी सामन्यापूर्वी पाकिस्तानच्या संघात मोठे बदल करण्यात आले होते, तरीही त्यांचा हा दौरा निराशाजनक रीतीने संपला. एजबॅस्टन कसोटीआधी संघात आणि प्रशिक्षक वर्गात अनेक बदल करण्यात आले, परंतु या बदलांचा सामन्याच्या निकालावर कोणताही परिणाम झाला नाही.

जिंकायसाठी १३० धावांचे लक्ष्य गाठताना इंग्लंडने पहिल्याच षटकात बेन डकेट आणि एमिलिओ गे यांच्या रूपात आपले दोन्ही सलामीवीर गमावले. मोहम्मद अब्बासने हे दोन्ही बळी घेतले. त्यानंतर जो रूट आणि जॉर्डन कॉक्स यांनी नाबाद अर्धशतके झळकावत इंग्लंडला विजय मिळवून दिला. या विजयामुळे इंग्लंडची गुण टक्केवारी सुधारून ३८.५४ % झाली आहे.दुसरीकडे, गुणतालिकेत नऊ संघांच्या यादीत पाकिस्तान सर्वात शेवटी (तळाशी) कायम असून त्यांची गुण टक्केवारी आणखी घसरून १४.८१ % वर आली आहे.

या चालू चक्रात ११ सामन्यांपैकी ५ विजय, ४ पराभव आणि २ अनिर्णित सामन्यांसह ५१.५२ % गुणांसह भारतीय संघ 'डब्ल्यूटीसी' गुणतालिकेत पाचव्या स्थानावर कायम आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील भारताचे पुढील आव्हान न्यूझीलंडविरुद्ध असणार आहे. १९ नोव्हेंबरपासून वेलिंग्टन येथे सुरू होणाऱ्या या दौऱ्यात भारत दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळणार आहे.

या पराभवासह पाकिस्तानच्या संघासाठी इंग्लंडचा दौरा अत्यंत निराशाजनक ठरला आहे. दरम्यान, आगामी सामन्यांमध्ये भारतीय संघाला आपल्या कामगिरीत सातत्य राखून गुणतालिकेतील स्थान अधिक मजबूत करण्याचे आव्हान असेल. न्यूझीलंडविरुद्धची आगामी कसोटी मालिका भारतासाठी डब्ल्युटीसीच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणार आहे.

### इंग्लंड- पाकिस्तान तिसऱ्या कसोटीत काय झालं?

पहिल्या डावात पाकिस्तानचा संघ अवघ्या १३३ धावांत गारद झाला. या मालिकेत पाकिस्तानची २०० हून अधिक धावा करण्यात अपयशी ठरण्याची ही पाचवी वेळ होती. दुसऱ्या डावात मात्र त्यांनी पुनरागमन करत ४४९ धावा उभारल्या. यामध्ये अझान अवैस, शान मसूद, बाबर आझम आणि पदार्पण करणाऱ्या रझाउल्लाह (ज्याची तळाच्या फलंदाजांमधील कामगिरी लक्षवेधी ठरली) यांच्या अर्धशतकांचा समावेश होता.इंग्लंडने पहिल्या डावात तब्बल ३२० धावांची भक्कम आघाडी घेत सामन्यावर आधीच पकड मजबूत केली होती. त्यांच्या पहिल्या पाच फलंदाजांनी अर्धशतके ठोकली.

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। सोमवार ।
दि. 14 सप्टेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती




# पवना नदी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर!

## सरकारकडे प्रकल्पासाठी निधीच नाही; हरित लवादासमोर धक्कादायक माहिती

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पवना नदी प्रदूषण नियंत्रण आणि नदी पुनरुज्जीवनाबाबत सरकारकडून सातत्याने आश्वासने दिली जात असताना आता राज्य सरकारने राष्ट्रीय हरित लवादासमोर या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध नसल्याचे स्पष्ट केले आहे. शासनाच्या निधीवर अवलंबून असलेल्या या प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**



पवना नदीच्या प्रदूषणासंदर्भातील सुरू असलेल्या प्रकरणात राष्ट्रीय हरित लवादाने राज्य सरकार, राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय (एनआरसीडी) आणि पिंपरी-चिंचवड महापालिका यांनी एकत्र येऊन प्रदूषण नियंत्रणाच्या कामांसाठी निश्चित आराखडा व कालबद्ध कार्यक्रम सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, त्यानंतर संबंधित संस्थांनी नुकत्याच दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रांमधून निधीचा गंभीर पेच निर्माण झाल्याचे समोर आले आहे. राज्य सरकारने या प्रकल्पासाठी आपल्याकडे निधी उपलब्ध नसल्याचे म्हटले आहे. तर, 'एनआरसीडीने'ही (राष्ट्रीय नदी संवर्धन संचलनालय) निधी उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करून पिंपरी-चिंचवड महापालिकेने इतर स्रोतांमधून निधी उपलब्ध करण्याचे पर्याय शोधावेत, अशी भूमिका घेतली आहे.

यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) प्रस्तावित कामांबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे. विशेषतः राज्य किंवा केंद्र सरकारच्या निधीवर अवलंबून असलेल्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पवना नदी प्रदूषणाच्या प्रश्नावर अनेक वर्षांपासून आश्वासने आणि घोषणा करण्यात येत आहेत. मात्र, प्रत्यक्षात प्रदूषण नियंत्रणाच्या कामांना अपेक्षित गती मिळालेली नाही. देशातील अत्यंत प्रदूषित नदीपट्ट्यांमध्ये पवना नदीचा समावेश झाल्याने मावळ व पिंपरी-चिंचवड परिसरासह पुण्याकडे आणि पुढे उजनी खोऱ्यापर्यंतच्या भागातील पर्यावरण व सार्वजनिक आरोग्यावर याचा परिणाम होत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या सन 2019 च्या आदेशानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने पवना नदी प्रदूषण नियंत्रणाशी संबंधित कामे सन 2021 पर्यंत पूर्ण करण्याचे ग्वाही दिली होती. मात्र, ते पूर्ण झाले नाही. सध्याच्या हरित लवादाच्या प्रकरणातही महापालिकेने कामे पूर्ण करण्याची ग्वाही दिली होती. मात्र, प्रकल्प अद्याप अपूर्ण असून, एनआरसीडीकडून निधी न मिळाल्याचे कारण विलंबासाठी देण्यात आले आहे. आता राज्य सरकार आणि एनआरसीडी या दोन्ही संस्थांनी निधी उपलब्ध नसल्याची भूमिका घेतल्याने महापालिका आणखी किती काळ प्रतीक्षा करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच, आर्थिक क्षमता असूनही प्रकल्पाच्या अंमलबजावणीत विलंब होत राहिल्यास संबंधित महापालिकेकडून पर्यावरणीय नुकसानभरपाई व जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात येईल, असा इशाराही ॲड. घर्रे यांनी दिला आहे.

### महापालिकेची हजारो कोटींची आर्थिक क्षमता

सन 2024-25 च्या आर्थिक विवरणपत्रानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे सुमारे 4 हजार 899 कोटी 71 लाख रुपयांच्या बँक मुदत ठेवी होत्या. महापालिकेची गुंतवणूक आणि बँक शिल्लक मिळून सुमारे 8 हजार 125 कोटी रुपये इतकी रक्कम आहे. संबंधित आर्थिक वर्षात महापालिकेला सुमारे 407 कोटी रुपयांचे उत्पन्न व्याजातून मिळाले आहे. इतकी भक्कम आर्थिक स्थिती असताना पवना नदीसारख्या महत्त्वाच्या पर्यावरणीय प्रश्नासाठी बाह्यनिधीची प्रतीक्षा का केली जात आहे. स्वतःच्या आर्थिक स्रोतांचा वापर करून पवना नदी प्रदूषण नियंत्रणाचे काम का हाती घेतले नाही, असा प्रश्न या प्रकरणात हरित लवादामध्ये याचिका दाखल करणारे ॲड. कृणाल घर्रे यांनी उपस्थित केला आहे.

# चाकण-आळंदी औद्योगिक पट्ट्यात वाहतूक कोंडीचा पेच!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**चाकण-आळंदीच्या औद्योगिक पट्ट्यात दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक कोंडी नित्याची झाली आहे. आता त्याच कोंडीला कायमस्वरूपी उत्तर देण्यासाठी रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे सुरू झाली आहेत. मात्र, काम सुरू असताना वाहतूक सुरळीत ठेवण्याचे मोठे आव्हान पीएमआरडीएसमोर उभे राहिले आहे. त्यामुळे सहा प्रमुख मार्गांवर टप्प्याटप्प्याने एकेरी वाहतूक लागू करण्याचा प्रस्ताव पीएमआरडीएने वाहतूक पोलिसांकडे दिला आहे. प्रस्तावित नियोजनानुसार १० सप्टेंबरपासून वाहतूक बदल अपेक्षित होता; मात्र, त्याबाबत अद्याप निर्णय झालेला नसल्याने रस्ते विकासकामांना अपेक्षित वेग मिळण्यात अडथळे निर्माण होत आहेत.**



चाकण, मोई, निघोजे, कुरुळी, खालुंब्रे, आळंदी आणि एमआयडीसी फेज-३ या परिसरातील महत्त्वाच्या जोडरस्त्यांचे रुंदीकरण, काँक्रिटीकरण आणि डांबरीकरण हाती घेण्यात आले आहे. ५.५० ते १० मीटरपर्यंत रस्त्यांची रुंदी वाढविण्याचे नियोजन असून, काही रस्त्यांची कामे नोव्हेंबर, तर काहींची डिसेंबरअखेरपर्यंत सुरू राहणार आहेत. कामाच्या ठिकाणी दोन्ही बाजूंनी वाहतूक सुरू राहिल्यास कोंडी वाढण्याची शक्यता असल्याने पीएमआरडीएने पर्यायी मार्गांचे नियोजनही केले आहे.

आळंदी-मरकळ रस्ता ते चऱ्होलीमार्गे आळंदी रस्ता या दोन किलोमीटरच्या मार्गाची रुंदी १० मीटर असल्याने येथे सध्या एकेरी वाहतूक लागू करण्याची आवश्यकता नसल्याचे पीएमआरडीएने स्पष्ट केले आहे. चाकण-आळंदी औद्योगिक परिसरात मोठ्या प्रमाणात कंपन्या, कामगारांची वाहतूक आणि मालवाहू वाहनांची ये-जा असते. त्यामुळे अरुंद रस्ते आणि वाढता वाहनभार यांचे समीकरण कोंडीला कारणीभूत ठरत आहे. रस्ते रुंदीकरणाची कामे पूर्ण झाल्यानंतर वाहतुकीची क्षमता वाढण्यास मदत होणार असली, तरी कामाच्या काळातील वाहतूक व्यवस्थापन हा तितकाच महत्त्वाचा टप्पा आहे. ८ किलोमीटरचा चाकण फाटा-आळंदी रस्ता या सहा कामांपैकी सर्वांत मोठा टप्पा आहे. १० सप्टेंबर ते ३० डिसेंबरदरम्यान काम सुरू राहणार आहे.

### 'वन-वे'चा निर्णय महत्त्वाचा

रस्ते रुंदीकरणाची कामे सुरू असताना वाहतुकीचे नियोजन झाले नाही, तर विकासकामांमुळेच कोंडी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पीएमआरडीएने सुचविलेल्या एकेरी वाहतुकीच्या नियोजनाबाबत वाहतूक पोलिसांकडून निर्णय होणे महत्त्वाचे ठरणार आहे. औद्योगिक वाहतूक, अवजड वाहने आणि स्थानिक वाहतूक यांचा मोठा ताण असलेल्या या पट्ट्यात पर्यायी मार्गांची अंमलबजावणी झाल्यास कामाच्या कालावधीत वाहनचालकांना काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो.

# शाळकरी विद्यार्थ्यांनी साकारल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयाचा जनजागृतीपर उपक्रम

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या ‘ड’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २७ मधील कै. भिकोबा तांबे प्राथमिक शाळा व मेमोरियल हायस्कूल येथील विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच नागरिकांनाही पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले.**




‘ड’ क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे, मुख्य आरोग्य निरीक्षक शंकर घाटे, आरोग्य निरीक्षक गणेश राजगे तसेच आरोग्य मुकादम प्रदीप जगताप, आबासाहेब कदम, किरण त्रिभुवन आणि डिवाईन सुपरवायझर यश लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली डिवाईन वेस्ट मॅनेजमेंट अँड सर्व्हिसेसच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करण्यात आली तसेच गणेशमूर्ती स्पर्धेचे आयोजन करून सहभागी विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांच्या मार्गदर्शनाखाली शहरभर ‘माझी वसुंधरा ७.०’ आणि ‘स्वच्छ सर्वेक्षण २०२६’ अभियानांतर्गत पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी गणेशोत्सवात प्लास्टिकचा वापर टाळणे, नैसर्गिक व पर्यावरणपूरक सजावटीला प्राधान्य देणे आणि परिसर स्वच्छ ठेवणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच हरित शिक्षक शपथ घेण्यात आली आणि स्वच्छतेच्या घोषणांद्वारे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

“विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची जाणीव निर्माण झाल्यास हा संदेश कुटुंब आणि समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचतो. त्यामुळे पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी पुढाकार घ्यावा,” असे सहाय्यक आरोग्य अधिकारी राजू साबळे यांनी सांगितले.

“गणेशोत्सवाची भक्ती आणि उत्साह कायम राखत पर्यावरणाचे संरक्षण करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे,” असे आरोग्य विभागाच्या वतीने सांगण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती किन्हाळे, मुख्याध्यापक श्री. सर्जे तसेच शिक्षकवर्गाच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

## तत्त्वम सोशल फाउंडेशनच्या कार्यातून प्रेरणा; उद्योजक सागर बोकेफोडे यांचा वृद्धाश्रमात वाढदिवस साजरा

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**वाढदिवसानिमित्त होणाऱ्या पार्ट्या आणि अनावश्यक खर्चाला फाटा देत उद्योजक सागर बोकेफोडे यांनी सामाजिक बांधिलकीचा अनोखा आदर्श घालून दिला. तत्त्वम सोशल फाउंडेशनच्या सामाजिक कार्यापासून प्रभावित होऊन त्यांनी आपला वाढदिवस कान्हे येथील किनारा वृद्धाश्रमातील आजी-आजोबांच्या सहवासात सेवाकार्य करत साजरा केला.**





यावेळी आश्रमातील वृद्धांना थंडीपासून संरक्षणासाठी ब्लँकेट्स तसेच पौष्टिक व आवडीच्या अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. केवळ वस्तूवाटप न करता उपस्थित मान्यवर व कार्यकर्त्यांनी वृद्धांशी थेट संवाद साधत त्यांच्या सुख-दुःखाची आत्मीयतेने विचारपूस केली. वाढत्या वयात हक्काच्या माणसांची सोबत सुटलेल्या या निराधारांना ‘कोणीतरी आपली काळजी घेणारे आहे’ हा विश्वास या उपक्रमामुळे मिळाला.

एका बाजूला तरुणाईची सामाजिक जाणीव आणि दुसऱ्या बाजूला ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यातील कृतज्ञतेचे भाव, असा दोन पिढ्यांना जोडणारा भावूक प्रसंग या वेळी पाहायला मिळाला. वाढदिवसावर अनाठायी खर्च करण्यापेक्षा या ज्येष्ठ माऊलींच्या चेहऱ्यावरील हसू आणि समाधान हाच माझ्यासाठी सर्वोत्तम आशीर्वाद असल्याचे मनोगत सागर बोकेफोडे यांनी या वेळी व्यक्त केले. तत्त्वम सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून समाजातील वंचित घटकांच्या पाठीशी उभे राहण्याचा संकल्प कायम राहील, असा विश्वास या प्रसंगी व्यक्त करण्यात आला.

या सेवाकार्याविळी तत्त्वम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र ठिकेकर, सचिव वंदना चौहान, खजिनदार मनीषा थोरात-पिसाळ, सदस्य आयुष चौहान, संदीप पिसाळ, रवींद्र लंघे, कैलास कोकाटे यांच्यासह उद्योजक सागर बोकेफोडे यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. झगमगाटाच्या काळात सामाजिक भान जपत साजरा झालेला हा वाढदिवस उपस्थितांची मने जिंकून गेला.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway
Station